# जनावरांमधील स्तनदाह लक्षणे, उपचार आणि प्रतिबंधक उपाय

डॉ. अश्विनी मुखेकर
सहाय्यक प्राध्यापिका (पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग)
डॉ. डी. वाय. पाटील कृषी महाविद्यालय, तळसंदे

जनावरांमधील स्तनदाह हा रोग असांसर्गिक रोग म्हणून ओळखला जातो. ज्या रोगांची संपर्कामुळे लागण होत नाही त्यास असांसर्गिक रोग म्हणतात. दुधाळू गुरांना होणारा हा रोग निरनिराळ्या प्रकाच्या जीवाणूंमुळे होतो. यात प्रामुख्याने स्टेप्टोकोकस, स्टॅफलोकॉक्स, ई.कोलाय, कॉर्निबॅक्टेरियम व मायकोबॅक्टेरियम यांचा समावेश होतो. या रोगामुळे दुधाळ गुरे मृत्यु पावत नसली, तरी दूध उत्पादन कमी होत असल्यामुळे आर्थिक नुकसान फार मोठ्या प्रमाणात होते. या रोगाचे जीवाणू बहुधा कासेवर किंवा वातावरणात आजूबाजूला असतात. गुरांची प्रतिकारशक्ती कमी झाल्यास किंवा कासेवर, सडावर जखम असल्यास जिवाणू त्यातून कासेच्या आतील बाजूस प्रवेश करतात व या आजाराची लागण होते. याशिवाय गोठ्यातील व दूध काढणा-याची अस्वच्छता यामुळे या रोगजंतूचा प्रसार होण्यास मदत होते. अपुरे दूध काढल्यास, जास्त प्रमाणात प्रथिने दिल्यास किंवा थंडी जास्त असल्यासही हा रोग होवू शकतो. गायीची कास मोठी व लोंबती असल्यास, सडांना मोठे छिद्र असल्यासही हा रोग होण्याची संभावना असते.

### लक्षणे:

१) कास सुजते आणि दुखते
२) कासेतून पू बाहेर पडतो
३) कासेला हात लावल्यास गरम वाटते
४) कधीकधी गुरांना ताप येतो
५) दूधग्रंथीत मृत पेशीचे प्रमाण वाढल्यामुळे कासेत गाठी येतात
६) अति तीव्र रोगात कालवून दूध येणे एकाएकी बंद होते.
७) गुरे सुस्त व चारा खाणे बंद करतात
८) अशा गुरांचे दूध काढल्यास ते खतमिचिन दिसतें
९) कासेवर सुज येऊन कास कडक होते
१०) सुजलेल्या कासेस हात लावल्यास उष्ण लागते व कास दुखते
११) जुनाट स्वरुपात काहीवेळेसस डातून दूध येणे बंद होते.

### उपचार:

१) स्तनदाह जिवाणूंमुळे होत असल्याने जिवाणूंची लागण नष्ट करण्याकरिता उपाययोजना करावी
२) स्तनदाह झालेल्या कासेच्या भागातील दूध काढून टाकावे व प्रती जौविकयुक्त औषधी ट्यूब कासेत भरावी. त्यानंतर किमान २४ तास त्या सडातून दूध काढू नये
3) शरीराचे तापमान वाढले तर स्नायूद्वारे प्रतिजैविक अथवा सल्फा औषधी दयावी
४) जुनाट स्वरूपातल्या स्तनदाहामध्ये गुराने दूध देणे बंद केल्यावर भाकडकाळात उपचार केल्यास फायदेशीर ठरते.

### प्रतिबंधक उपाय:

१) दूध काढते वेळी स्वच्छता ठेवावी
२) गोठा स्वच्छ करून दूध काढणा-याने हात स्वच्छ धुवावे
3) दुभत्या गुरांची कास स्वच्छ पाण्याने धुवावी व मगच दूध काढावे
४) ज्या गुरांना या रोगाची लागण असेल अशा गुरांचे दूध शेवटी काढावे
५) सडाना किंवा कासेला झालेल्या जखमांवर त्वरित उपचार करावेत.

(संपर्क: +९१ ७२१८०८३९४९)

★ ★ ★

### तुती लागवड

जून ते ऑगस्ट या कालावधीमध्ये तुती लागवड करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना रोपांची उपलब्धता होईल या दृष्टीने जानेवारी- फेब्रुवारी महिन्यापासून रोपवाटिकेच्या नियोजनास सुरवात करावी. रोपवाटिकेचे संपूर्ण एक वर्षाचे नियोजन करावे, जेणेकरून व्यापारी दृष्टिकोनातून रोपवाटिका व्यवसाय करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांची जमीन मोकळी राहणार नाही.

तुती रोपवाटिकेसाठी पाण्याचा योग्य निचरा होणारी जमीन आवश्यक असते. क्षारयुक्त, दगड-गोटेयुक्त जमीन नसावी. जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ च्या दरम्यान असावा. जमिनीची खोली किमान ३ फूट असावी. जमीन कृमी, वाळवी आदी रोगकारक किडींपासून मुक्त असावी. जमिनीची दोनदा नांगरट करून घ्यावी. त्यानंतर जमिनीत प्रति एकर १० मेट्रिक टन शेणखत एकसारखे पसरावे. जमिनीच्या प्रतीनुसार १०-२० टन वाळू जमिनीत पसरून बैलजोडीच्या साह्याने नांगरटीद्वारे खत-वाळू जमिनीत एकसारखे मिश्रण करून जमीन एकसमान करून घ्यावी, जेणेकरून तुती रोपवाटिकेस पाणी देणे सुलभ होईल.

रोपवाटिकेसाठी ३ मीटर लांब, १ मीटर रुंद आणि १० सें.मी. उंच व चारही बाजूंनी पाण्यासाठी चर असलेले गादीवाफे तयार करून घ्यावेत. एक एकर तुती रोपवाटिका क्षेत्रामध्ये सुमारे १०६५ गादीवाफे तयार होतात. गादीवाफ्यामध्ये कलमे लावण्याच्या १५ दिवस अगोदर गादीवाफे पाण्याने भिजवून घ्यावेत, जेणेकरून जमिनीत असलेल्या तणांचे बी उगवेल व कलमे लावण्यापूर्वी गादीवाफ्यातील तण हलकेच काढून त्यांचे नियंत्रण करता येईल.

(उर्वरित पान क्र. १३ वर...)